# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 270/2022 दिनांक: 11.07.2022

## पोस्टे विमानतळ गुन्हे शोध पथकानी दोन आरोपीतांकडुन सहा मोटार सायकली केल्या जप्त

**मा. श्री प्रमोद शेवाळे साहेब**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी मो सा चोरी करणाऱ्या आरोपीतांचा शोध घेवुन जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने पोस्टे विमानतळचे पोनि **मा. श्री अनिरूध्द काकडे**, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गस्ती दरम्यान गोपनीय माहीती काढुन दोन आरोपीतांना ताब्यात घेऊन त्यांचेकडे बारकाईने चौकशी केली असता विवीध पोस्टेच्या हध्दीतुन व पोस्टे विमानतळ हध्दीतुन मो सायकली चोरल्याची कबुली दिली आहे. पोस्टे विमानतळ गुरन 42/2022 कलम 379 भादवि, गुरन 234/2022 कलम 379 भादविचे दोन गुन्हे उघडकीस आले असुन इतर पोस्टे हध्दीतील चार मो सायकली अशा एकुण सहा मो सायकली किंमती 3,50,000/—रूपयाचा मुद्येमाल दोन आरोपीतांचे ताब्यातुन जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी गुन्हे शोध पथकातील सपोनि श्री गिते, पोउपनि जाधव, पोहेकॉ/धारासिंग राठोड, कानंगुले, गायकवाड, पोना बंडु पाटील कलंदर, माधव नागरगोजे, पोकॉ दत्ता गंगावरे, नानेश्वर भिसे, सतीश मेंद, चालक पोना भारत गुरूपवार यांनी केलेली आहे.

पोस्टे विमानतळ यांचे उत्कृष्ट कामगीरी बदल **मा. श्री प्रमोद शेवाळे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री. निलेश मोरे**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री विजय कबाडे**, अपर पोलीस अधिक्षक भोकर, **मा. श्री चंदशेन देशमुख**, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, **मा. श्री द्वारकादास चिखलीकर**, पोनि स्थागुशा यांनी सदर पोलीस अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केलेले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड